Source: Sakal News Paper (Pune Zilha Today) on dated 23RD May, 2015 (Page No.7)

-------------------------------------------

## JALYUKTA SHIVAR ABHIYAN AT KANHERSAR, TAL: KHED, DIST: PUNE

# जलयुक्त शिवार योजनेमुळे पाण्याची उपलब्धता वाढणार

### आमदार गोरेंचे प्रतिपादन; कनेरसरला ओढा खोलीकरण

**दावडी, ता. ६ :** शेतीसाठी शाश्वत पाणी उपलब्ध करून देण्याचे आव्हान आज आपल्यासमोर आहे. गावागावांत पिण्यासाठी, जनावरांसाठी व शेतीसाठी उपलब्ध असणारे पाणी व गरज यातील तफावत भरून काढण्यासाठी विविध उपाययोजना करणे व गावाला पाणीदार करणे ही जलयुक्त शिवार अभियानामागची मूळ संकल्पना आहे, असे प्रतिपादन आमदार सुरेश गोरे यांनी कनेरसर (ता. खेड) येथे केले.

कनेरसर येथे जलयुक्त शिवार अभियानांतर्गत भारत फोर्ज लिमिटेड कंपनीमार्फत पाझर तलावातील गाळ काढणे, नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यात येणार आहे. या कामाचा प्रारंभ गोरे यांच्या हस्ते झाला. प्रांताधिकारी हिम्मतराव खराडे, तहसीलदार प्रशांत आवटे, भारत फोर्ज सीएसआर फंडच्या व्यवस्थापिका लीना देशपांडे, तालुका कृषी अधिकारी लक्ष्मण होटकर, मंडल कृषी अधिकारी नामदेव भालेराव, सरपंच सुजाता दौंडकर, हनुमंत दौंडकर, चंद्रशेखर वाळके, महादू ताम्हाणे व परिसरातील शेतकरी या वेळी उपस्थित होते. खराडे म्हणाले, "पावसाचा प्रत्येक थेंब अडवून भूगर्भातील पाणीपातळी वाढविण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे." सदर काम पूर्ण झाल्यावर ७.५० टीसीएम पाणीसाठा वाढणार आहे. तलावातील माती शेतकऱ्यांनी वाहून नेऊन पड जमिनीत टाकून सदर जमीन लागवडीखाली आणली जाईल. या योजनेच्या माध्यमातून पडजमिनीचाही विकास साधला जाणार आहे. भारतफोर्ज कंपनीने या कामासाठी ११.६० लाख रुपयांचा निधी देणार आहे.



कनेरसर (ता. खेड) : जलयुक्त शिवार अभियानांतर्गत तलावातील गाळ काढण्याच्या कामाचा प्रारंभ करताना आमदार सुरेश गोरे.

पुणे जिल्हा TODAY

7/17/2015 1 2 3 4 5 6 7 8 9 10

मुख्य अंक पुणे टुडे पिंपरी चिंचवड पिंपरी चिंचवड टुडे पुणे जिल्हा पुणे जिल्हा टुडे बारामती टुडे

# 'जलयुक्त'मुळे खेडमध्ये वाढले तिप्पट पाणी

### प्रांत हिंमतराव खराडे यांची माहिती; कनेरसरमधील कामांची पाहणी

**दावडी, ता. १६ :** खेड तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवडलेली १५ गावे जलयुक्त करण्यासाठी लोकसहभाग, सीएसआर व सरकारमार्फत पाणलोटच्या सर्व उपाययोजना केल्या जात आहेत. पूर्ण झालेल्या व प्रगतिपथावर असलेल्या कामांमुळे या गावांचा पाणीसाठा तिप्पटीने वाढला असल्याची माहिती खेडचे उपविभागीय अधिकारी हिंमतराव खराडे यांनी कनेरसर (ता. खेड) येथे केले.

खेड तालुक्याच्या पूर्व भागातील जऊळके, वाफगाव व कनेरसर या टंचाईग्रस्त गावांत जलयुक्त शिवार अभियानांतर्गत केलेल्या कामांची पाहणी खराडे यांनी मंगळवारी केली. तसेच या गावांमध्ये सामाजिक वनीकरण विभाग, वन विभाग व कृषी विभागाच्या माध्यमातून प्रत्येक गावात पाच हजार झाडे लावली जाणार असून, त्याची सुरवातही खराडे यांच्या हस्ते झाली. या वेळी तालुका कृषी अधिकारी लक्ष्मण होटकर, मंडल कृषी अधिकारी नामदेव भालेराव, बाबा साळुंके, प्रमिला मडके, कविता रोडे, शांता आढळ, दादासाहेब नाईकरे, मुख्याध्यापक के. बी. गोसावी, गोविंदराव गोरडे, तलाठी विक्रम सरवदे, बाबा हजारे, सुदामराव मासेरे आदी उपस्थित होते.

खराडे म्हणाले, "खेड तालुक्यात एकूण २७५ कामे हाती घेतली असून, २२४ कामे पूर्ण व ५१ कामे प्रगतिपथावर आहेत. या २७५ कामांमध्ये सलग समतल चर, सिमेंट नाला बांध, माती नाला बांध, मजगी, शेततळे, लूज बोल्डर, चेक डॅम, साठवण टाकी, पाझरतलाव, ठिबक सिंचन, तुषार सिंचन, गाळ काढणे व दुरुस्ती या प्रकारची कामे सुरू आहेत. लोकसहभागातून ७५ लाख रुपये, कंपन्यांच्या सीएसआर फंडातून अडीच कोटी, तर टंचाईग्रस्त गावांमध्ये जलस्रोत निर्माण करण्यासाठी सरकारने तीन कोटी रुपयांचा निधी खर्च केला आहे. जलशिवार अभियानापूर्वी या गावांचा पाणीसाठा २५० टीसीएम होता, तर अभियानानंतर झालेल्या कामांमुळे ७४५ टीसीएम पाणीसाठा वाढला आहे. झालेल्या कामांमुळे २५० हेक्टर क्षेत्राला हंगामी स्वरूपात फायदा होणार आहे व गावच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे."

या वेळी खराडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत निसर्गाचे चक्र बदलत चालले असून, जलयुक्त अभियानातून वृक्ष लागवडीची संकल्पना राबविली जात असल्याचे व मूल्य शिक्षणाचा भाग म्हणून शाळांचा समावेश जाणीवपूर्वक केल्याचे सांगितले.

या वेळी कनेरसर परिसरात कृषी विभागाचे सर्व उपक्रम यशस्वी राबविल्याबद्दल खराडे यांच्या हस्ते कृषी सहायक प्रमिला मडके यांचा सत्कार झाला. सूत्रसंचालन बबनराव दौंडकर यांनी केले व आभार प्रमिला मडके यांनी मानले.

Source: Sakal News Paper on dated 7th May, 2015 (Page No. 6)